# वसंत देसाई - भाग ४



दिग्गज गीतकार भरत व्यास यांच्या कल्पनाविश्वातून विस्मित करणारी गीते घेऊन १९५९ साली गूँज उठी शहनाई' हा त्यांचा चित्रपट धडकला. यातील 'मैने पीना सिख लिया' ही अत्यंत उत्कृष्ट रितीने बांधलेली नज़्म ऐकल्यावर असे वाटेल की यात प्यायल्यानंतर येणारी जडवाई केवळ रफीच्या आवाजातच न दिसता, व्हायोलिनचा आवाजही तसाच भारावलेला वाटतो. जोगिया रागावर आधारित 'कह दो कोई ना करे यहाँ प्यार' या गाण्यातून या दिग्गज संगीतकाराने रफीच्या गळ्यातून दर्दभऱ्या वेदनेचे दर्शनच घडवले आहे. याशिवाय 'तेरी शहनाई बोले' (लता, रफी आणि त्यांच्या आवाजाबरोबरच बिस्मिल्ला खान यांच्या अप्रतिम सनईने नटलेले हे गाणे), राग गारामधील 'जीवन मे पिया तेरा साथ रहे' (लता, रफी) हे रसरशीत आणि ठेक्याचे गाणे, 'अखियाँ भूल गयी है सोना' (लता, गीता आणि कोरस) आणि 'दिल का खिलौना हाये टूट गया' (बिस्मिल्ला खान यांच्या भैरवी रागातील सनईची साथ') आणि बिहाग रागातील तबल्याच्या १-२-३, १-२-३ या दादऱ्याच्या ठेक्यातील 'तेरे सूर और मेरे गीत' ही दोन हृदयाचा ठाव घेणारी लताची गाणी या सर्व गाण्यांनी या चित्रपटाला चार चाँद लावले.

इतकी उत्तमोत्तम गाणी दिल्यानंतर त्यांनी पुढील चित्रपटांसाठीही अप्रतिम चाली बांधल्या : 'स्कूल मास्टर' ('ओ दिलदार, बोलो एक बार'/लता व तलत), 'प्यार की प्यास' ('क्या धरती और क्या आकाश'/रफी, लता, कोरस आणि 'सावन के झूले पडे'/लता व तलत), 'संपूर्ण रामायण' ('सन, सनन सनन, सनन'/लता, राग चंद्रकंस), 'रामराज्य' ('रैन भयी, सोजा रे पंछी'/लता, राग गुर्जर, तोडी भीमपलासी), 'आशीर्वाद' ('झिर झिर बरसे सावन अखियाँ'/लता, राग खमाज आणि 'इक था बचपन'/लता, राग गुर्जरी तोडी), 'गुड्डी' ('बोल रे पपीहरा'/वाणी जयराम, राग मिया की मल्हार आणि 'हमको मन की शक्ती देना'/वाणी जयराम, राग केदार मध्ये कोरस)

अशी होती वसंत देसाई यांची सांगितिक कारकीर्द आणि त्यांच्या रागदारीवर आधारलेल्या, वाद्यमेळ्याने सजलेल्या-धजलेल्या सुरेख आणि अवीट गोडीच्या गाण्यांच्या आठवणी कायमच मनात साठून राहतील.

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com